जा.क्र.मअसंसं/वै.स./जे.सु/आ.१०/२६२/ सन २०१४

महाराष्ट्र अभि.संशोधन संस्था,
नाशिक.४
दिनांक : २०/१/२०१४

प्रति,
मा.मुख्य अभियंता व संचालक,
महाराष्ट्र अभियांत्रिकी प्रशिक्षण प्रबोधिनी नाशिक
१)अधीक्षक अभियंता,धरण सुरक्षितता संघटना,नाशिक.
२)अधीक्षक अभियंता, कोयना बांधकाम मंडळ, सातारा.

विषय :- राज्यातील जलसंपदा विभागातील वरिष्ठ वैज्ञानिक सहाय्यक / कनिष्ठ वैज्ञानिक सहाय्यक/संशोधन सहाय्यक यांची दिनांक ३१.१२.२०१३ रोजीची माहिती संकलनासाठी तात्पुरती जेष्ठता सूची.

राज्यातील जलसंपदा विभागातील कार्यरत असलेल्या वरिष्ठ वैज्ञानिक सहाय्यक/ कनिष्ठ वैज्ञानिक सहाय्यक/संशोधन सहाय्यक यांची दिनांक ३१.१२.२०१३ अखेरची माहिती संकलनासाठी तात्पुरती जेष्ठता सूची प्रस्तुत करण्यात येत आहेत. सदर जेष्ठता सूची सर्व संबंधीतांच्या नजरेस आणावी त्यात काही उणिवा /दुरुस्त्या असल्यास त्या बाबत संबंधीतांचे लेखी निवेदन प्राप्त करुन घेऊन आपल्या अभिप्रायासह या कार्यालयास सोबतच्या विहीत प्रपत्रात एक महिन्याच्या आत पाठवावीत. म्हणजे अंतीम जेष्ठता सूची प्रस्तुत करतांना आवश्यक ती दुरुस्ती करता येइल. जेष्ठता सूची कर्मचा-यांच्या निदर्शनास न आणल्यामुळे मानीव दिनांका संबंधीची न्यायालयीन प्रकरणे निर्माण होण्याची शक्यता असते. त्यामुळे जेष्ठता सूची सर्व संबंधीत कर्मचा-यांच्या निदर्शनास आणण्यात येईल याची दक्षता घ्यावी व प्रत्येक कर्मचा-यांची स्वाक्षरी घेऊन आपल्या दप्तरी ठेवावी.

रकाना क्रमांक ३ मध्ये शैक्षणिक पात्रते संबंधीची माहिती संबंधीत कर्मचा-यांकडूनच अचूक असल्याची खात्री करावी. रकाना क्र. ९ मध्ये मागासवर्गीय कर्मचा-यांचा उल्लेख शासनाच्या सुचने नुसार उपलब्ध असलेल्या माहिती नुसार केलेला आहे तथापी काही कर्मचा-यांच्या बाबतीत तो मागासवर्गीय असुनही उल्लेख करावयाचा राहीला असल्यास अशा कर्मचा-यांची माहिती मुळ सेवापुस्तकावरुन तपासुन व दाखल्यातील नोंदी तपासुन जात वैधता प्रमाणपत्राच्या साक्षांकित प्रतीसह या संस्थेकडे पाठवावी. म्हणजे संस्थेतील प्रतीवर नोंद घेऊन अंतीम जेष्ठता सूची प्रसिध्द करतांना तसा उल्लेख केला जाईल. रकाना १० मधील जात प्रमाणपत्र पडताळणीचे वैधता प्रमाणपत्र प्राप्त झाले किंवा नाही याची कर्मचा-याने नोंद घ्यावी व आक्षेप असल्यास एक महिन्याचे आंत योग्य मार्गाने कळवावा.

--२--

जेष्ठता सूची बाबत काही आक्षेप/अभिप्राय असल्यास सर्व कर्मचा-यांचे अभिवेदन घेऊन तशा प्रकारचे प्रमाणपत्र एक महिन्याच्या आत या संस्थेस पाठवावे अन्यथा तात्पुरती ज्येष्ठता सूची बरोबर असल्याचे गृहीत धरुन व तीच अंतिम जेष्ठता सूची समजण्यात येईल याची कृपया नोंद घ्यावी ही विनंती.

**स्थळ प्रत अ.अ.व सहसंचालक यांची सही असे.**

अधीक्षक अभियंता व सहसंचालक,
महाराष्ट्र अभियांत्रिकी संशोधन संस्था,
नाशिक.४करिता

**सहपत्र** : १) तात्पुरती जेष्ठता सूचीची प्रत

प्रत : संशोधन अधिकारी,कार्यकारी अभियंता,वैज्ञानिक संशोधन अधिकारी (सर्व विभाग) मेरी, नाशिक यांना माहितीसाठी व वरील प्रमाणे कार्यवाही साठी रवाना.

**सहपत्र** : १) तात्पुरती जेष्ठता सूचीची प्रत

प्रत- महाराष्ट्र अभियांत्रिकी संशोधन संस्थेच्या संकेतस्थळावर www.merinashik.org.in

**सहपत्र** : १) तात्पुरती जेष्ठता सूचीची प्रत